गुणवत्ता दर्जा सुधार योजनेअंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

*शासन निर्णय क्र.प्रतिनि-२००८/(१६२ /०८)/तांशि-२,*

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.

दिनांक :-१८/० ७/२००८

संदर्भ:-संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची-

१) का.क्र.४अ/ आस्था/पीएच.डी/प्रतिनि/२००८/७२५,दि.१२/२/२००८,

२)का.क्र.४अ/ आस्था/पीएच.डी/प्रतिनि/२००८/१५३९,दि.२६/२/२००८,

३ )का.क्र.४अ/ आस्था/पीएच.डी/प्रतिनि/२००८/७२८,दि.२६/२/२००८,

४)का.क्र.४अ/ आस्था/पीएच.डी/प्रतिनि/२००८/९३३,दि.१५/३/२००८

५) का.क्र.४अ/ आस्था/पीएच.डी/प्रतिनि/२००८/१७३४,दि.१४/७/२००८ ची पत्रे

**शासन निर्णयः-** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय तंत्रनिकेतनातील सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** मध्ये नमूद अध्यापकांची केंद्र शासनाच्या गुणवत्ता सुधार योजने (QIP) अंतर्गत स्नातकोत्तर अध्ययनासाठी (पीएच.डी.) सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी निवड झालेली आहे.

२. संबधीत संस्थेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही या तसेच क्र.प्रतिनि २०९५/१९५५७/(१९५/९५)/तांशि-४ दि.२०.११.१९९६ च्या शासन निर्णयनुसार विहीत करण्यात आलेल्या खालील नमूद अटींच्या अधीन राहून संबधीत अध्यापकांना प्रतिायुक्तीवर पाठविण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे:-

१. प्रतिनियुक्ती पूर्ण निर्धारित कालावधीकरीता असेल.

२. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत संबधीत अध्यापकाच्या जागेवर दुस-या व्यक्तींची नियुक्ती करण्यास मान्यता असेल.

३. प्रतिनियुक्तीवरील अध्यापकास खालील अट क्र.८ चे अधिन राहून त्यांच्या प्रतिायुक्तीच्या कालखंडात वेतन व भत्ते शासन अदा करील.

४. त्यांच्या वेतनाव्यतिरिक्त ज्या संस्थेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले त्या संस्थेने त्यांना विद्यावेतन/ शिष्यवृत्ती दिल्यास ती स्विकारण्यास त्यांना परवानगी देण्यात येत आहे.

५. प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी जाण्यासाठी किवा प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तसेच प्रतिनियुक्ती संपल्यावर मुख्यालयात परत येण्यासाठी त्यांना प्रवासभत्ता वा दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६. त्यांना त्यांच्या उर्वरित सेवाकालावधीत कधीही अध्ययन रजा घेता येणार नाही व तसे बंधपत्र प्रशिक्षणासाठी जाण्यापूर्वी त्यांना कार्यालयाकडे द्यावे लागेल.

७. संबधीत अभ्यासक्रमासाठी करारीर्दिष्ट काळापेक्षा जास्त कालावधी वाढवून मिळण्यास त्यांनी अर्ज केल्यास प्रतिनियुक्तीच्या वाढलेल्या कालावधीसाठी त्यांची देय व अनुज्ञेय रजा समजण्यात येईल.

८. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासनाची सलग ६ वर्षे सेवा करण्याचे बंधपत्र त्यांना प्रशिक्षणासाठी जाण्यापूर्वी द्यावे लागेल. हे बंधपत्र त्यांना शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०६८/डी-१०, १५.१०.१९६८ सह शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०६९, २१.६.१९७९ मध्ये विहित केल्याप्रमाणे द्यावे लागेल.

९. संबधीत अध्यापक जर त्यांचे प्रशिक्षण अर्धवट सोडून येतील किवा बंधपत्राप्रमाणे शासनाची सेवा करणार नाहीत,त्यांच्याकडून शासनाने त्यांच्यावर केलेला संपूर्ण खर्च प्रचलित व्याजासह वसूल करण्यात येईल.

१०. प्रतिनियुक्तीचा कालावधी सेवाकाळ म्हणून समजण्यात यावा.

११. सदर प्रशिक्षणासाठीची प्रतिनियुक्ती त्यांच्या पेक्षा ज्येष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अगोदर पदोन्नतीसाठी आधारभूत ठरू शकणार नाही.

३. उपरोक्त नमूद क्र.६ व ८ बाबींवरील बंधपत्रे संबधीत अध्यापकांकडून प्रतिनियुक्तीसाठी कार्यमुक्त करण्यापूर्वी घेण्याची संबधीतांनी दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त अध्यापकांना स्नातकोत्तर (पीएच.डी.) अभ्यासक्रमाच्या पूर्वतयारीकरीता ४ वेळा संबधीत संस्थेला भेट द्यावी लागते आणि त्याचा कालावधी ६० दिवसांचा असून त्याबाबतही परवानगी देण्यात येत आहे.

५. असे प्रमाणित करण्यात येते की, संबधीत अध्यापकांना गुणवत्ता दर्जा सुधारणा कार्यक्रमानुसार पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पाठविण्यात आले नसते तर,वरील अभ्यासक्रमाच्या काळात त्याच पदावर स्थानापन्न झाले असते.

६. सदर आदेश शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.प्रतिनि २०९५/१९५५७/ (१९५/९५)/तांशि-४ दि.२०.११.१९९६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानानुसार व नावांने,

(अ.गो.खडपकर)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,अमरावती,नाशिक,अमरावती.

संबधीत संस्थाप्रमुख.

प्रबंधक, मोतीलाल नेहरु नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, अलाहाबाद,

प्रबंधक,मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर

प्रबंधक,राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ

प्रबंधक,जादवपूर विद्यापीठ,कोलकता-७०० ०३२ .

महालेखापाल (लेखा व आज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड, ठाणे, गडचिरोली, वाशिम, नांदेड, रत्नागिरी, यवतमाळ; अहमदनगर, अमरावती, नागपूर, अमरावती, पुणे,

संबधीत अध्यापक

निवड नस्ती/तांशि-२.

शासन निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्र.प्रतिनि-२००८/(१६२ /०८)/तांशि-२,दि.१८/७/२००८ सोबतचे प्रपत्र-अ

| अ.क्र | अधिका-यांचे नाव व पदनाम | कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | पीएच.डी.करीता प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नांव | पीएच.डी. करीता निवडलेला अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.ए.के.उपाध्याय, विभागप्रमुख,स्थापत्य अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन,पेण | मोतीलाल नेहरु नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, अलाहाबाद | स्थापत्य अभियांत्रिकी |
| २. | श्री.व्ही.पी.राठोड, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन,ठाणे | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | यंत्र अभियांत्रिकी |
| ३. | श्री.ए.एस.बहेंडवार, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली | राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ | मॅन्युफेक्चरिंग टेक्नॉलॉजी |
| ४. | श्री.एस.आर.आढाऊ, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन,वाशिम | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | यंत्र अभियांत्रिकी |
| ५. | श्री.एम.एम.पावडे, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ | मॅन्युफेक्चरिंग टेक्नॉलॉजी |
| ६. | श्री.आर.ए.पाटील, अधिव्याख्याता,अणुविद्युत अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | अणुविद्युत |
| ७. | श्री.आर.आर.चौधरी, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | जाधवपूर विद्यापीठ,कोलकत्ता | यंत्र अभियांत्रिकी |
| ८. | श्री.लो.के.मेश्राम, अधिव्याख्याता,उपयोजित यंत्रशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर | राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ | उपयोजित यंत्रशास्त्र |
| ९. | श्री.एस.डी.धोबें, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी | जाधवपूर विद्यापीठ,कोलकत्ता | यंत्र अभियांत्रिकी |
| १०. | श्री.एस.एस.बारस्कर, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ | यंत्र अभियांत्रिकी |
| ११. | श्री.एम.एन.पांडे, अधिव्याख्याता,स्थापत्य अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | स्थापत्य अभियांत्रिकी |
| १२. | श्री.अ.अ.गढीकर,अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन,पुणे | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | यंत्र अभियांत्रिकी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | श्री.ज.ग.जोशी, अधिव्याख्याता,विद्युत अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन,पुणे | राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ | विद्युत अभियांत्रिकी |
| १४. | श्री.सु.तु.धोत्रे, अधिव्याख्याता,स्थापत्य अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन,पुणे | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | स्थापत्य टेक्नॉलॉजी |
| १५. | श्री.एस.बी.वेस्ली,कर्मशाळा अधिक्षक, | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | मोतीलाल नेहरु नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, अलाहाबाद | यंत्र अभियांत्रिकी |
| १६. | श्री.सी.पी.कांबळे,कर्मशाळा अधिक्षक | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर | राष्ट्रीय तकनीकी शिक्षक प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान,चंदीगढ | |
| १७. | श्री.पी.पी.पाटील, अधिव्याख्याता,यंत्र अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | जाधवपूर विद्यापीठ,कोलकत्ता | यंत्र अभियांत्रिकी |
| १८. | श्री.कि.एल.मेश्राम, अधिव्याख्याता,धातुशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | मालवीय नॅशनल इन्स्टिटुयट ऑफ टेक्नॉलॉजी,जयपुर | धातुशास्त्र |
| १९. | श्री.एस.एम.काळे, अधिव्याख्याता,अणुविद्युत अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | जाधवपूर विद्यापीठ,कोलकत्ता | अणुविद्युत |
| २०. | श्री.व्ही.एम.आठवले, अधिव्याखता,संगणक अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | जाधवपूर विद्यापीठ,कोलकत्ता | यंत्र अभियांत्रिकी |

-----------